## विभाग तिसरा

## १९७६-७७ ते १९७९-८० काळातील प्रगती

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेची १९७६-७७ ते १९७९-८० या कालखंडामध्ये प्रगती दिसून येते आहे. कारण १९७६-७७ ते १९७९-८० या कालखंडात सातत्याने संस्थेच्या सभासद संख्येमध्ये वाढ होत आहे. कारण त्यापुढे ही संस्था जास्तीत जास्त लोकाभिमुख आहे. जास्तीत जास्त लोकांना सहकारी चळवळीमध्ये समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे.

संस्थेचे भाग भांडवलसुध्दा सातत्याने वाढत आहे व आर्थिक उलाढाल सुध्दा समाधानकारक आहे.

संस्थेची १९७६-७७ ते १९७९-८० या कालखंडातील प्रगतीदर्शक आकडेवारी खालील तक्त्यामध्ये नमूद केलेली आहे.

## तक्ता क्र. २.१२

### १९७६-७७ ते १९७९-८० या काळातील संस्थेची प्रगतीदर्शक आकडेवारी

(आकडे रूपयात)

| अनु. | तपशील | १९७६-७७ | १९७७-७८ | १९७८-७९ | १९७९-८० |
|---|---|---|---|---|---|
| १. | सभासद संख्या | ४८६ | ५१५ | ५३३ | ५४५ |
| २. | भाग भांडवल | १३७९५० | १६८४६५ | १८७४३५ | १९७८५० |
| ३. | खत खरेदी | १६२१३८ | १५८४५६ | १०४४५४ | १३६५८३ |
| ४. | खत विक्री | १६३९५५ | १६०२३८ | १०५६८० | १३७००५ |
| ५. | रिझर्व फंड व इतर फंड | ३५१७६ | ६९७५७ | ७५८९७ | ९०४०४ |
| ६. | बँक कर्ज | २४४४८८ | ३३२९३३ | १८१०१७ | २३७७७४ |
| ७. | सभासद कर्ज | ४५२४५२ | ५१२८५१ | ३९६४७४ | ३८००२६ |
| ८. | शेअर्स व इतर गुंतवणूक | ४७५०५ | ७७२८० | ८१५८० | ११२७५५ |
| ९. | नफा | १९५३२ | १०००६ | - १८८९४ | १५३४१ |
| १०. | देवघेव व उलाढाल | १०४६६२२ | १२४४१६९ | ८९७३५८ | १११५२२३ |
| ११. | खेळते भांडवल | ५३८००३ | ६६६५२० | ५१९९९९ | ६०९१३२ |
| १२. | थकबाकी | १२७३६८ | १४६९५७ | १९५०२४ | ११३८१४ |
| १३. | तपासणी वर्ग | क | ब | ब | ब |

१) सभासद संख्या :

१९७६-७७ ते १९७९-८० या कालखंडामध्ये संस्थेची सभासद संख्या सातत्याने वाढलेली आहे. कारण १९७६-७७ मध्ये सभासद संख्या ४८६ होती. १९७७-७८ मध्ये सभासद संख्या ५१५ होती तर १९७८-७९ मध्ये ५३३ होती आणि १९७९-८० मध्ये ती ५४५ इतकी झालेली आहे. म्हणजेच सातत्याने संस्थेची सभासद संख्या वाढत आहे.

२) भाग भांडवल :

१९७६-७७ ते १९७९-८० या कालखंडात संस्थेचे भाग भांडवलसुध्दा सातत्याने वाढत गेलेले आहे. कारण १९७६-७७ मध्ये भाग भांडवल रु. १,६२,१३८ होते. १९७७-७८ ते मध्ये ते रु. १,६८,४६५ झाले. १९७८-७९ मध्ये ते रु. १,८७,४३५ झाले व १९७९-८० मध्ये रु.१,९७,८५० इतके झाले. म्हणजेच संस्थेच्या भागभांडवलामध्ये वाढ होत आहे.

३) खत खरेदी :

संस्था सभासदांना खतांच्या स्वरूपात कर्ज पुरवठा करते कारण कर्ज जर रोख स्वरूपात दिले तर शेतकरी त्यांचा वापर शेती उत्पादन वाढीसाठी करणार नाहीत. म्हणून खते खरेदी करून त्यांची विक्री सभासदांना केली जाते. १९७६-७७ मध्ये संस्थेने रु.१,६२,१३८ चे खत खरेदी केले तर १९७७-७८ मध्ये रु. १,५८,४५६ चे खत खरेदी केले. १९७८-७९ मध्ये रु. १,०४,४५४ आणि १९७९-८० मध्ये रु. १०,३६,५८३ चे खत खरेदी केले आहे. सभासदांची मागणी विचारात घेऊन संस्था खत खरेदी करते.

४) खत विक्री :

संस्थेमार्फत सभासदांना योग्य दराने खतांची विक्री केली जाते. १९७६-७७ मध्ये रु. १,६३,९५५ चे रासायनिक खते विकली. तर १९७७-७८ मध्ये संस्थेने रु. १,६०,२३८ चे खते विकली. १९७८-७९ मध्ये

रू. १,०५,६८० चे खत विकले आणि १९७९-८० मध्ये संस्थेने रू.१,३७,००५ चे खत विकले. संस्थेचे खत विक्रीचे प्रमाण कमी कमी होत गेलेले आहे. कारण सभासदांच्या कर्जमंजुरीनुसार संस्था खतांची विक्री करत आहे.

५) रिझार्व फंड व इतर फंड :

१९७६-७७ ते १९७९-८० या कालखंडात संस्थेच्या रिझार्व व इतर फंडात सातत्याने वाढ झालेली आहे. कारण १९७६-७७ मध्ये फंडाची रक्कम रू.३५,१७६ होती ती वाढून १९७७-७८ मध्ये रू. ६९,७५७ झाली. व १९७८-७९ मध्ये त्या रकमेमध्ये वाढ होऊन रू. ७५,८९७ झाली आणि १९७९-८० मध्ये ती रक्कम रू. ९०,४०४ झाली. म्हणजे रिझार्व व इतर फंडाची रक्कम वाढत गेलेली आहे.

६) बँक कर्ज :

संस्था सभासदांना कर्ज पुरवठा करण्यासाठी बँक कर्ज घेते. १९७६-७७ मध्ये संस्थेने रू. २,४४,४८८ चे बँक कर्ज घेतले. तर १९७७-७८ मध्ये संस्थेच्या बँक कर्जात वाढ होवून ते रू. ३,३२,९३३ इतके झाले. परंतु १९७८-७९ मध्ये संस्थेने घेतलेल्या बँक कर्जात घट झाली. म्हणजे १९७८-७९ मध्ये संस्थेने रू. १,८१,०१७ स्वढे बँक कर्ज घेतले आहे. संस्थेच्या बँक कर्जात १९७८-७९ मध्ये घट होण्याचे कारण म्हणजे जे सभासद थकबाकीदार नाहीत त्यांनाच संस्थेकडे कर्ज मागणी करता येते व सभासदांची कर्ज मागणी विचारात घेऊन आवश्यक तेवढे बँक कर्ज घेतले जाते. १९७८-७९ मध्ये थकबाकीदार सभासद जादा होते. त्यामुळे थोडया सभासदांनी कर्ज मागणी केली व कर्ज मागणीनुसार बँक कर्ज कमी घेतले आहे. १९७९-८० मध्ये संस्थेने रू. २,३८,७७८ चे बँक कर्ज घेतले आहे.

७) सभासद कर्ज :

१९७६-७७ मध्ये संस्थेने सभासदांना रू. ४,५२,४५२, १९७७-७८ मध्ये रू. ५,१२,८५१ इतका कर्ज पुरवठा केला व १९७८-७९ मध्ये संस्थेने

सभासदांना दिलेल्या कर्ज पुरवठयामध्ये घट झालेली आहे. कारण १९७८-७९ मध्ये संस्थेने सभासदांना रु. ३,९६,४७४ इतके कर्ज पुरवठा केला कर्ज पुरवठयामध्ये घट होण्याचे कारण म्हणजे संस्था सभासदांच्या मागणीनुसार कर्ज पुरवठा करते व जे सभासद थकबाकीदार आहेत त्यांना कर्ज देता येत नाही. १९७८-७९ मध्ये थकबाकीदार सभासद जास्त आहेत. त्यामुळे त्यांना कर्ज दिलेले नाही.

८) शेअर्स व इतर गुंतवणूक :

संस्थेने कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर, बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक, शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर , करवीर तालुका शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर या सहकारी संस्थेचे शेअर्स खरेदी केलेले आहेत. व ठेवी रूपाने गुंतवणूक केलेली आहे. १९७६-७७ ते १९७९-८० या चार वर्षात संस्थेची गुंतवणूक सातत्याने वाढत गेलेली आहे. कारण १९७६-७७ मध्ये गुंतवणूक रु. ४७,५०५ इतकी होती. ती १९७७-७८ मध्ये रु. ७७,२८० इतकी झाली. १९७८-७९ मध्ये गुंतवणूक रु. ८१,५०० इतकी झाली आणि १९७९-८० मध्ये रु. १,१२,७५५ इतकी झाली.

९) नफा :

नफा मिळविणे हे सहकारी संस्थांचे उद्दिष्ट नाही. तरी परंतु अन्य खाजगी संस्था बरोबर व्यवसायातील धोके व अनिश्चितता स्विकारल्यामुळे या संस्थेला नफा झालेला आहे.कारण १९७६-७७ मध्ये संस्थेला रु. १९,५३२, १९७७-७८ मध्ये रु. १०,००६, १९७८-७९ मध्ये रु. १८,८९४ व १९७९-८० मध्ये रु. १५,३४१ इतका नफा झाला आहे.

१०) देवघेव व उलाढाल :

१९७६-७७ ते १९७९-८० या कालावधीत संस्थेची उलाढाल १९७६-७७ मध्ये रू. १०,४६,६२२ इतकी होती, १९७७-७८ मध्ये रू. १२,४४,१६९ इतकी होती. म्हणजे १९७७-७८ मध्ये संस्थेची उलाढाल वाढलेली आहे तर १९७८-७९ मध्ये संस्थेची उलाढाल रू. ८,७९,३५८ इतकी होती. १९७८-७९ मध्ये उलाढाल कमी झालेली आहे कारण १९७८-७९ मध्ये संस्थेने कर्ज पुरवठा कमी केलेला आहे. परत १९७९-८० मध्ये संस्थेची उलाढाल वाढलेली आहे. १९७९-८० मध्ये संस्थेची उलाढाल रू.११,१५,२२३ इतकी होती.

११) खेळते भांडवल :

१९७६-७७ पेक्षा १९७७-७८ मध्ये संस्थेच्या खेळत्या भांडवलामध्ये वाढ झालेली आहे कारण १९७६-७७ मध्ये खेळते भांडवल रू.५,३८,००० इतके होते तर १९७७-७८ मध्ये रू. ६,६६,५२० इतके होते. म्हणजेच खेळते भांडवल वाढलेले आहे.संस्थेच्या ठेवी, कर्ज घेण्याचे प्रमाण व देण्याचे प्रमाणात वाढ झालेली आहे. परंतु १९७८-७९ मध्ये खेळत्या भांडवलामध्ये घट झालेली आहे. कारण संस्थेने घेतलेल्या कर्जाच्या प्रमाणात व दिलेल्या कर्जाच्या प्रमाणात घट झालेली आहे. १९७९-८० मध्ये संस्थेच्या खेळत्या भांडवलामध्ये वाढ होऊन ती रू. ६,०९,१३२ इतकी झाली.

१२) थकबाकी :

१९७६-७७ ते १९७९-८० या कालावधीमध्ये संस्थेचे थकबाकीचे प्रमाण जास्त आहे व सातत्याने वाढत गेलेले आहे. कारण १९७६-७७ मध्ये थकबाकी रू. १,२७,३६८ इतकी होती तर १९७७-७८ मध्ये ती रू.१,४६,९५७ इतकी झाली. १९७८-७९ मध्ये रू. १,९५,०२४ इतकी झाली आणि १९७९-८० मध्ये रू. १,१३,८१४ इतकी झाली. थकबाकी मध्ये वाढ होण्याचे कारण म्हणजे संस्थेने थकबाकी कमी करण्याकडे दुर्लक्ष केलेले आहे.

१३) तपासणी वर्ग :

संस्थेची हिशोब तपासणी झाल्यानंतर कायद्यातील तरतुदी नुसार १९७६-७७ मध्ये ` क ` वर्ग, १९७७-७८ मध्ये ` ब ` वर्ग, १९७८-७९ मध्ये ` ब ` वर्ग व १९७९-८० मध्ये ` ब ` वर्ग मिळालेला आहे.

१४) संस्थेचे सभापती व त्यांचा कालावधी :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेच्या सभापतींचा १९७६-७७ ते १९७९-८० पर्यन्तचा कालावधी खालीलप्रमाणे आहे :

| अनु. | सभापतीचे नाव | सभापतीपदाचा कालावधी |
|---|---|---|
| १. | श्री. पांडुरंग शिवाप्पा कदम | १९७६ ते २८-१०-७७ |
| २. | श्री. बजीरंग हरी मेढे | १९-१०-७७ ते ११-११-७९ |
| ३. | श्री. बाळासाो जनार्दन पोवार | १२-११-७९ ते ९-७-८० |

संदर्भ : संस्थेचे छापील वार्षिक अहवाल
व इतर कागदपत्रे.